प्रथम मान्यता

८८४

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/ ९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :-

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ पिंपरी- चिंचवड, पुणे.

विषय :- सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत. माध्यम - इंग्रजी

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील शासनपत्र क्रमांक : व्हीएसएच-१०९९/[१२७] प्राशि-३, दिनांक - २७ मे, १९९९

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव. | शाळेचे ठिकाण. | माध्यम. |
|---|---|---|---|
| १) | ज्ञान एज्युकेशन ट्रस्ट, पुणे-. | ज्ञान एज्युकेशन ट्रस्ट, थोरात स्कूल, चिंचवड, पुणे. | इंग्रजी |
| २) | श्री. टागोर शिक्षण संस्था, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे-२६. | श्री. टागोर विद्यालय, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे-२६ | इंग्रजी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहीत नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे / न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधित संस्थेने कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार केल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

.....२/-